राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परीषद सिंधुदुर्ग

| | |
|---|---|
| फोन नंबर - 02362228568 | ई - मेल- dpmnrhmsindhudurg@gmail.com |
| जा. क्र. सिंजिप./आवि/राआअ/आयुष/ 108/2018 | दिनांक - 9/7/2018 |

## पदभरती जाहिरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान आरोग्य विभाग जिल्हा परीषद सिंधुदुर्ग

अंतर्गत आरोग्य उपकेंद्र ठिकाणी हेल्थ ॲण्ड वेलनेस सेंटर (आरोग्यवर्धिनी) करिता, कंत्राटी पदधतीने कम्युनिटी हेल्थ प्रोव्हायडर या पदा (BAMS- वैद्यकीय अधिकारी) करिता अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या पदाबाबत अटी व शर्ती तसेच इतर आवश्यक ती सर्व माहिती विस्तृत जाहिरातीसह, जिल्हा परीषद सिंधुदुर्ग संकेत स्थळ www.zpsindhudurg.maharashtra.gov.in वर प्रसिदध करण्यात आलेली आहे. तरीही इच्छुक उमेदवारांनी सदर पदांकरिता विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह स्वत: साक्षांकित करुन, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय आरोग्य विभाग जि. प. सिंधुदुर्ग येथे दिनांक 24/07/2018 पर्यंत प्रत्यक्ष येवून जमा करावेत, पोस्टाने किंवा टपालाने आलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत तसेच दिनांक 24/07/2018 रोजी संध्याकाळी 5.00 वाजल्यानंतर आलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

सचिव
सिं.जि.ए.आ.व कु.क.सो.आ
(कार्यकारी समिती) तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

अध्यक्ष
सिं.जि.ए.आ.व कु.क.सो.आ
(कार्यकारी समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय
जिल्हा परीषद सिंधुदुर्ग
फोन नंबर 02362228568
ई-मेल- dpmnrhmsindhudurg@gmail.com

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परीषद सिंधुदुर्ग अंतर्गत, आयुष्यमान भारत या योजनेंतर्गत तालुकानिहाय कंत्राटी तत्वावर खालील निर्देशित केलेल्या पदांची भरती करण्यात येणार आहे.

| पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | अर्ज स्विकृती ठिकाण | शैक्षणिक अर्हता | पदाचे मानधन | जातनिहाय पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| हेल्थ वेलनेस सेंटर आरोग्य उपकेंद्र - (आरोग्यवर्धिनी केंद्र अंतर्गत) कम्युनिटी हेल्थ प्रोव्हायडर (Community Health Provider) (CHP) | तालुका – 1. वेंगुर्ला 2. सावंतवाडी 3. दोडामार्ग 4. देवगड (सविस्तर यादी जोडल्या प्रमाणे) | जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग, राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष | बी.ए.एम.एस | प्रति महिना मूळ मानधन रुपये 25,000/- + कामावर आधारित मोबदला व इतर भत्ते कमाल रुपये 15000/- | सोबत जोडलेल्या यादीनुसार |

- नियुक्तीच्या अटी आणि शर्ती :

1) अर्जाच्या छाननीअंती सदर निकषानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हा रुग्णालयांत प्रशिक्षणाकरिता नामनिर्देशित करण्यात येईल.
2) या प्रशिक्षणांचा कालावधी सहा महिने राहील सदर प्रशिक्षण कालावधीकरिता उमेदवारांना सहा महिन्याकरिता प्रतिमहा रुपये 10,000/- प्रमाणे विदयावेतन दिले जाईल. (प्रशिक्षण कालावधीत काणतेही भत्ते किंवा राहण्याची सोय देय राहणार नाही.)
3) प्रशिक्षणअंती अंतिम परीक्षा (Exit Exam) घेतली जाईल. परीक्षेअंती उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येईल व उत्तीर्ण झालेल्या उमेंदवारांना प्रवर्गनिहाय 11 महिन्यांची कंत्राटी नियुक्ती देण्यात येईल.
4) पदनियुक्ती दिलेल्या उमेंदवारांने प्रति दिवशी किमान दहा गृहभेटी देणे अनिवार्य आहे.
5) अंतिम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेंदवारांना प्रमाणपत्र देण्यात येईल. हे प्रमाणपत्र आरोग्य उपकेंद्र ठिकाणी कम्युनिटी हेल्थ प्रोव्हायडर म्हणून कामकाज करण्यासाठी उपयुक्त ठरेल. या प्रमाणपत्राचा वापर विशेषतज्ञ म्हणून खाजगी व्यवसायात करता येणार नाही.

- **सर्वसाधारण अटी व शर्ती :**
    1) सदरची सर्व पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून, महाराष्ट्र शासनाची नियमित पदे नाहीत.
    2) एकूण पदसंख्येच्या ( म्हणजेच 80 ) दिडपट ( म्हणजेच 120) उमेंदवारांना प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देण्यात येईल. प्रशिक्षणाअंती अंतिम परीक्षा (Exit Exam) उत्तीर्ण झालेल्या गुणानुक्रमे पहिल्या 80 उमेंदवारांना नियुक्ती देण्यात येईल. उर्वरित उमेदवारांना प्रतिक्षा यादी मध्ये समाविष्ट करण्यात येईल
    3) कम्युनिटी हेल्थ प्रोव्हायडर या पदांकरिता प्रथम प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्ती देताना बीएएमएस अंतिम वर्षांचे गुण ग्राहय धरले जातील.
    4) उच्च शिक्षण धारण केलेल्या उमेदवारांना अतिरीक्त पाच गुण दिले जातील. ( पदव्युत्तर पदवीका - 2 गुण, पदव्युत्तर पदवी - 5 गुण, )
    5) शासकिय/निमशासकिय/राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना एका वर्षाच्या अनुभवाकरिता एक गुण या प्रमाणे कमाल पाच गुण दिले जातील.
    6) तालुक्यातील स्थानिक उमेदवारांस अतिरीक्त वीस गुण देण्यात येतील. उमेदवारांनी कोणत्या तालुक्यासाठी अर्ज केला आहे हे नमूद करणे आवश्यक आहे. उमेदवार एकावेळी जिल्हयातील एकाच तालुक्याकरिता अर्ज करु शकतो.
    7) कम्युनिटी हेल्थ प्रोव्हायडर या पदासाठी संवर्ग निहाय समांतर आरक्षण लागू राहिल.
    8) अंतिम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रवर्ग निहाय 11 महिन्यांची कंत्राटी नियुक्ती देण्यात येईल. सदर नियुक्ती केंद्र शासनाच्या अधिन राहून देण्यात येईल.सदरची योजना काही कारणास्तव बंद झाल्यास, उमेदवारांची नियुक्ती संपुष्टात येईल असे झाल्यास उमेदवारांना कोणत्याही प्रकारच्या न्यायालयांत जाता येणार नाही.
    9) खुला प्रवार्गाकरिता कमाल वयोमर्यादा 38 वर्षे व इतर आरक्षित प्रवर्गा करिता कमाल वयो मर्यादा 43 वर्षे एवढी राहिल. राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत कार्यरत असलेल्या उमेदवारांकरिता वयाची अट पाच वर्षे शिथिल करण्यात आलेली आहे.
    10) वरील आदेशात सुधार व बदल करण्याचे सर्व अधिकार निवड समितीला राहतील.
    11) सोबत जोडलेल्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे स्वत: साक्षांकित करुन राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय आरोग्य विभाग जिल्हा परीषद सिंधुदुर्ग येथे दिनांक 24/07/2018 पर्यंत प्रत्यक्ष जमा करावेत त्यानंतर जमा केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत तसेच पोस्टाने किंवा टपालाने पाठविलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेला ईमेल आयडी कमीत कमी एकावर्षापर्यंत वापरात ठेवावा. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवारांना ई मेल वदारे कळविण्यात येईल.
    12) सदरची विस्तृत जाहिरात व पदस्थापनेची ठिकाणे जिल्हा परीषद सिंधुदुर्गच्या वेवसाईट www.zpsindhudurg.maharashtra.gov.in वर देण्यात आलेली आहेत.

सचिव
सिं.जि.ए.आ.व कु.क.सो.अो.
(कार्यकारी समिती) तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा

अध्यक्ष
सिं.जि.ए.आ.व कु.क.सो.अो
(कार्यकारी समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग